वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई,
पुरुषोत्तम खेराज भवन, एन.एस रोड, मुलुंड प. मुंबई
४०००८०
दुरध्वनी क्रमांक –०२२ २५६८४५३५
email id- mulundpstn@gmail.com

## -: प्रेस नोट :-

### वयोवृद्ध नागरीकास धमकावुन जबरीने दागीणे काढून घेणारे ०३ आरोपीतांना अटक केलेबाबत

दिनांक ०८/०९/२०२२ रोजी एक ६० वर्षीय इसम हे नेहरू रोड येथून रस्त्याने पायी चालत घरी जात असतांना दुपारचे १४.५० वाजता विदयाविहार मॅरेथॉन बिल्डींगच्या दुकानासमोर, सेवाराम लालवाणी रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई या ठिकाणी तीन अनोळखी इसमांनी जुनी ओळख असल्याची बतावणी करून फिर्यादीडुन ४४ ग्रॅम वजनाचे सान्याचे दागीने व पाकिटातील २,०००/-रु. काढून घेतले व आरडा ओरडा, केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावरुन त्यांनी पोलीस ठाणे येवून दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र ५४७/२२ कलम ३९२,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

मुलुंड पोलीस ठाणे तसेच मुंबई शहर व परिसरात अशाच प्रकारचे गुन्हे वारंवार घडत असल्याने, सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून मा. श्री प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ०७, मुंबई, श्री दत्तात्रय शिंदे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, मुंबई व मुलुंड पोलीस ठाण्याचे वपोनि श्री कांतिलाल कोथिंबीरे यांनी गुन्हयाचे घटनास्थळी तात्काळ भेट दिली. सदर गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक तयार करुन गुन्हयाचा जलद गतीने तपास सुरु केला.

सदर गुन्हयाचे घटनास्थळ व घटनास्थळ परिसरातील सी सी टी व्ही कॅमेरांचे फुटेज बारकाईने तपासले असता, सदरचा गुन्हा अभिलेखावरील आरोपी रमेश विजयकुमार जैस्वाल, नरेश विजयकुमार जैस्वाल, संजय दत्ताराम मांगडे यांनी केल्याचे निष्पन्न झाले. सदरचे आरोपी हे अशा प्रकारचे गुन्हे करून लपून राहण्यास माहिर असल्याने त्यांचा मागमुस लागत नव्हता. त्यावर मुलुंड पोलीस ठाण्याचे सपोनि. गणेश मोहिते व पथकाने कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपीचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याचा तांत्रीक अभ्यास करुन त्याद्वारे दिनांक २०/०९/२०२२ रोजी नमुद तीनही आरोपींना म्हापे, नवी मुंबई येथील एका लॉजवरुन ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या तपासात त्यांनी मुंबई परिसरातील मुलुंड, नवघर, पंतनगर, भोईवाडा, विलेपार्ले, वांद्रा, ठाणे शहर परिसरात ठाणे नगर, वर्तकनगर, कल्याण बाजारपेठ, डोंबीवली, कोळसेवाडी, अंबरनाथ, नवीमुंबई परिसरात कामोठे, मुंबई सेंट्रल रेल्वे, ठाणे रेल्वे, कल्याण रेल्वे असे एकुण १८ या ठिकाणी फसवणुकीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांनी आणखीन गुन्हे केल्याची शक्यता आहे. नमुद आरोपींकडुन गुन्हयातील मालमत्तेसह **एकूण ३३० ग्रॅम सोन्याचे दागीणे, सोन्याची लगड** अशी **१४,८५,०००/- रुपये** एव्हढया किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. नमुद आरोपींचा पुर्व अभिलेख तपासला असता त्यांच्यावर एकत्रीपणे १०० पेक्षा जास्त गुन्हे मुंबई शहर व परिसरात दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री विवेक फणसळकर सो., पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त(का व सु) बृहन्मुंबई, मा. श्री. संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर मा.श्री प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ०७, मुंबई, श्री दत्तात्रय शिंदे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ट पोलीस निरीक्षक कांतिलाल कोथिंबीरे, पो.नि. भुषण दायमा, पो. नि. रमेश ढसाळ, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा पोलीस निरीक्षक गणेश मोहिते, पोउपनि. चंद्रमोरे, म. पोउनि. कांचन थोरात, पो.ह. ४३७/कातकर, पो.ह. ४१३८/कोळी, म.पो.ह.९८०५०३/नलावडे, पो. ना. ०३३७९/बोडके, पो.ना. ०६११३३/वाळे, पो.शि.क्रं. ०९०५६०/विंचू, मपोशि. ०९१२१४/हडवळे,.पो.शि.क्रं. १११२७५/पारधी, पो.शि.क्रं.१४००७०/निकम या पथकाने केली आहे.